# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे – ४११००७

**Savitribai Phule Pune University**

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक : 020-25621205

Telephone No.: 020-25621205

Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग

P.G. Admission Section

Website: www.unipune.ac.in


**परिपत्रक**

**विषयः– उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची सन २०२५-२६ करिता महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत**

संदर्भ : शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, पुणे यांचे पत्र क्र. महाडीबीटी-२०२५-२६ (५६२९८३७/२०२५) दि. ०९/०७/२०२५.

या परिपत्रकाद्वारे मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था/ मा. विभागप्रमुख/मा. संचालक, सर्व विद्यापीठ शैक्षणिक विभाग/संकुल यांना कळविण्यात येते की, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या महाडीबीटी-२०२५-२६/(५६२९८३७/२०२५) दिनांक ०९/०७/२०२५ रोजीच्या शासन पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने महाडीबीटी पोर्टलद्वारे अंमलबजावणी करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष २०२५–२६ करिता महाडीबीटी पोर्टलवरून पात्र विद्यार्थ्यांकडून दि.३०.०६.२०२५ पासून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. सर्व पात्र विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता महाडीबीटी पोर्टल वरून ऑनलाईन अर्ज करू शकतात.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत महाडीबीटी पोर्टलवर राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांची महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. महाडीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरणेसाठी सहाय्य व्हावे तसेच महाविद्यालयातील लिपीक व प्राचार्य यांना अर्जांची पडताळणी करणेसाठी सहाय्य व्हावे यासाठी महाडीबीटी पोर्टलच्या संकेत स्थळावर https://mahadbt.maharashtra.gov.in यावर मॅन्युअल उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

शिष्यवृत्ती योजनांची प्रभावी पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी सर्व शिष्यवृत्ती योजनांची सर्वसाधारण माहिती तसेच महाविद्यालयाचे नोडल अधिकारी यांची अद्ययावत माहिती सर्व विद्यापीठ शैक्षणिक विभाग/ महाविद्यालय/संस्था यांनी त्यांचे संकेतस्थळ/दर्शनी भागात नोटीस बोर्डवर प्रसिध्द करून सर्व महाविद्यालयात प्रवेशित सर्व पात्र विद्यार्थ्यांना/ विद्यार्थिनींना ऑनलाईन अर्ज करण्यासाठी आवश्यक ती मदत करावी. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज भरणेसाठी आवश्यक कागदपत्रे (उत्पन्न दाखला, रहिवासी दाखला इ.) त्वरित प्राप्त होणेसाठी तहसिलदार/उपविभागीय कार्यालयामार्फत महाविद्यालयामध्ये शिबिर आयोजित करण्यात यावे. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम आधार संलग्नित बॅक खात्यामध्ये जमा करण्यात येते. त्यामुळे शिष्यवृत्ती रक्कम जमा होणेसाठी त्यांचे बॅक खात्याशी आधार क्रमांक संलग्नित करणे अनिवार्य आहे.

बॅंक खात्याशी आधार क्रमांक संलग्नीकरणासाठी बॅंकेसोबत संपर्क करून बॅंकेच्या शाखा प्रमुख/अधिकाऱ्यांमार्फत महाविद्यालयामध्ये बॅंक खात्यासोबत आधार क्रमांक संलग्नीकरणाकरिता शिबिर आयोजित करावेत. तसेच महाविद्यालय/संस्था/विद्यापीठातील शैक्षणिक विभाग यांचे मार्फत आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळा/शिबीर यांची माहिती **वेळोवेळी शिक्षण सहसंचालक उच्च शिक्षण, पुणे** या कार्यालयास सादर करावी .

(श्रीमती सुनिता **हजारे**)
उपकुलसचिव,

**गणेशखिंड पुणे — ७**
**संदर्भ : शै. प्रवेश/** ९८०८
**दिनांक :** १६/०७/२०२५

**सोबत:—** शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण), पुणे विभाग, पुणे यांच्या दिनांक ०९/०७/२०२५ रोजीच्या पत्राची प्रत.

**प्रत:**

१ मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ

२ मा. विभागप्रमुख/मा. संचालक, सर्व शैक्षणिक विभाग/संकुल, प्रस्तुत विद्यापीठ

यांना विनंती की वरील परिपत्रकाचा आशय सर्व संबंधिताच्या निदर्शनास आणून द्यावा.

महाराष्ट्र शासन
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**17, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे 411 001**
Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – jdhepune.in
फोन नं . - 020-26127833 / 26051632 फॅक्स नं. 020-26051632

जा.क्र. महाडीबीटी-2025-26/(5629837/2025)/ दि नांक : 09.07.2025

प्रति,

1. प्राचार्य,
   सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
   कायम विना अनुदानित वरिष्ठ कला, वाणिज्य,
   विज्ञान, विधी, शिक्षण शास्त्र, शारिरीक शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
   पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
   तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.
2. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
3. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
4. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
5. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
6. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
7. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.
8. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय : - उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांची सन 2025-26 करीता महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने प्रभावी अंमलबजावणी करणेबाबत.**

संदर्भ : - शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्य 2025/डीबीटी/E-1990174 दि. 07.07.2025.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, राज्य शासनाच्या विविध शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने महाडीबीटी पोर्टलद्वारे अंमलबजावणी करण्यात येत आहे. शैक्षणिक वर्ष 2025-26 करीता महाडीबीटी पोर्टलवरुन पात्र विद्यार्थ्यांकडून दि. 30.06.2025 पासून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. सर्व पात्र विद्यार्थी शैक्षणिक वर्ष 2025-26 करीता महाडीबीटी पोर्टल वरुन ऑनलाईन अर्ज करु शकतात.

उच्च शिक्षण संचालनालयामार्फत महाडीबीटी पोर्टलवर राबविण्यात येणाऱ्या 14 शिष्यवृत्ती योजनांची महाडीबीटी पोर्टलद्वारे ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करण्यात येत आहे. 14 शिष्यवृत्ती योजनांची नावे खालीलप्रमाणे नमूद करण्यात आली आहे.

| अनु.क्र. | योजनांची नावे |
|---|---|
| 1 | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना |
| 2 | डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना |
| 3 | एकलव्य आर्थिक सहाय्य |
| 4 | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (कनिष्ठ स्तर) |
| 5 | गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य योजना (वरिष्ठ स्तर) |

| | |
|---|---|
| 6 | राज्यशासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती |
| 7 | शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती |
| 8 | जवाहरलाल नेहरु विद्यापीठ शिष्यवृत्ती |
| 9 | राज्यशासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती |
| 10 | गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती |
| 11 | शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती |
| 12 | राज्यशासनाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती (भाग-2) |
| 13 | माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |
| 14 | स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |

महाडीबीटी पोर्टलवर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे अर्ज भरणेसाठी सहाय्य व्हावे तसेच महाविद्यालयातील लिपीक व प्राचार्य यांना अर्जांची पडताळणी करणेसाठी सहाय्य व्हावे यासाठी महाडीबीटी पोर्टलच्या संकेत स्थळावर https://mahadbt.maharashtra.gov.in यावर मॅन्युअल उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

विद्यार्थ्यांसाठी सूचना : -

1. उपरोक्त शिष्यवृत्तीसाठी https://mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज करणे आवश्यक आहे.
2. शिष्यवृत्तीचे शासन निर्णय अटी- शर्ती देय लाभ यांचे अवलोकन करुन विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावा.
3. उपरोक्त शिष्यवृत्तीबाबत अद्ययावत माहितीसाठी www.dhepune.gov.in या संकेतस्थळाचे वेळोवेळी अवलोकन करावे.
4. विद्यार्थी महाडीबीटी पोर्टलद्वारे लागू असलेल्या एकापेक्षा अधिक शिष्यवृत्तीसाठी अर्ज करु शकतात तथापि संबंधित विद्यार्थ्यांस त्यांनी निवडलेल्या Preference नुसार शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येणार असल्याने शिष्यवृत्तीचा Preference काळजीपूर्वक नोंदविण्यात यावा.
5. विद्यार्थ्यांना अर्जासोबत शिष्यवृत्तीच्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.
6. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्जामध्ये गुण नोंदविताना ते टक्केवारी (%) मध्ये नोंदविणे आवश्यक आहे. संच निर्धारित असलेल्या शिष्यवृत्तीसाठी लाभार्थ्यांची नि वड शिष्यवृत्तीच्या अटीनुसार ( उदा. टक्केवारी, उत्पन्न इ.) करण्यात येते.
7. शिष्यवृत्तीसाठी आधार क्रमांकाचा वापर करुन अर्ज भरता येतो. विद्यार्थ्यांना शि ष्यवृत्तीची रक्कम आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा होणार आहे. त्यामुळे शिष्यवृत्ती रक्कम जमा होण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांचे बँक खात्याशी आधार क्रमांक संलग्न करणे आवश्यक आहे.
8. ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचणी निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय / संस्थेच्या नोडल अधिकारी यांचेशी संपर्क साधून अचूक अर्ज भरावा.
9. विद्यार्थ्याने ऑनलाईन अर्ज भरताना विचारण्यात आलेली माहिती अचूक भरुन ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह आपल्या महाविद्यालयांकडे पुढील कार्यवाही करीता सादर करावी.

महाविद्यालय / संस्था / विद्यापीठांसाठी सूचना : -
1. विद्यार्थ्यांना ऑनलाईन पध्दतीने भरलेला शिष्यवृत्तीचे अर्ज पडताळणीसाठी संबंधित महाविद्यालयाच्या क्लर्क लॉगीन मध्ये पडताळणीसाठी उपलब्ध होतात.
2. शिष्यवृत्तीचे शासन निर्णय अटी- शर्ती लाभ आदि बाबींचा काळजीपूर्वक अभ्यास करुन महाविद्यालयातील लिपीकांनी विद्यार्थ्यांच्या अर्जाची पडताळणी करावी.
3. शिष्यवृत्ती निहाय आवश्यक कागदपत्रे विद्यार्थ्यांनी पोर्टलवर अपलोड केली असल्याची खात्री करावी. तसेच संबंधित विद्यार्थ्याने अर्जामध्ये भरलेली (अभ्यासक्रमाचे नाव, अभ्यासक्रमाचा प्रकार – अनुदानित / विना अनुदानित) अभ्यासक्रम कालावधी, प्रवेशाबाबतची माहिती (Admission

Details) टक्केवारी, शिष्यवृत्ती लाभ इ. काळजीपूर्वक पडताळणी करणे आवश्यक आहे.) महाविद्यालयाच्या क्लर्कनी त्यांच्या लॉगीनवर आलेल्या ऑनलाईन अर्जावर तातडीने स्कृटीनी करुन ( Approve / Reject / Sent Back ) करणे आवश्यक आहे.

4. महाविद्यालयाच्या लिपीकांनी मंजूर ( Approve ) केलेले शिष्यवृत्तीचे अर्ज पडताळणीसाठी संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्य लॉगीनवर उपलब्ध होतात.

5. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी महाविद्यालयांच्या लिपीकांप्रमाणे विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जांची पडताळणी करुन सदर अर्जावर तातडीने स्कृटीनी करुन ( Approve / Reject / Sent Back ) करणे आवश्यक आहे.

6. तसेच विद्यार्थ्यांच्या अर्जाची प्रत आवश्यक कागदपत्रांसहीत जतन करुन ठेवण्यात यावी.

7. विद्यार्थ्यांचे अर्ज वारंवार रिव्हर्ट ( Revert) होऊ नयेत, त्यांचे शिष्यवृत्तीचे अदायगीस विलंब होऊ नये यासाठी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे ऑनलाईन अर्ज अचूक भरण्यास महाविद्यालयाच्या नोडल अधिकारी यांनी मदत करावी. ती त्यांची जबाबदारी आहे.

शिष्यवृत्ती योजनांची प्रभावी पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी सर्व शिष्यवृत्ती योजनांची सर्व साधारण माहिती तसेच महाविद्यालयाचे नोडल अधिकारी यांची अद्ययावत माहिती सर्व विद्यापीठ / महाविद्यालय / संस्था यांनी त्यांचे संकेतस्थळ / दर्शनी भागात नोटीस बोर्डवर प्रसिध्द करुन सर्व महाविद्यालयात प्रवेशित सर्व पात्र विद्यार्थ्यांना / विद्यार्थीनींना ऑनलाईन अर्ज करण्यासाठी आवश्यक ती मदत करण्यात यावी. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज भरणेसाठी आवश्यक कागदपत्रे ( उत्पन्न दाखला, रहिवासी दाखला इ. ) त्वरीत प्राप्त होणेसाठी तहसिलदार / उपविभागीय कार्यालयामार्फत महाविद्यालयामध्ये शिबिर आयोजित करण्यात यावेत. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा करण्यात येते. त्यामुळे शिष्यवृत्ती रक्कम जमा होणेसाठी त्यांचे बँक खात्याशी आधार क्रमांक संलग्नित करणे अनिवार्य आहे. बँक खात्याशी आधार क्रमांक संलग्नीकरणासाठी बँकेसोबत संपर्क करुन बँकेच्या शाखा प्रमुख / अधिकाऱ्यांमार्फत महाविद्यालयामध्ये बँक खात्यासोबत आधार क्रमांक संलग्नीकरणाकरीता शिबिर आयोजित करावेत. तसेच महाविद्यालय / संस्था / विद्यापीठ यांचे मार्फत आयोजित करण्यात आलेल्या कार्यशाळा / शिबिर यांची माहिती वेळोवेळी या कार्यालयास सादर करावे.

**सोबत : सर्व योजनांची माहिती.**

Signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 10-07-2025 15:17:38

**(डॉ. अशोक उबाळे )**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

प्रत :- मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे 411016 यांना माहितीस्तव सादर.

# १.गुणवान विद्यार्थांना आर्थिक सहाय्य (कनिष्ठ स्तर)-(2202 0952)

| अ क्र | योजना | योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| १ | योजनेचे नाव | गुणवान विद्यार्थांना आर्थिक सहाय्य (कनिष्ठ स्तर) |
| २ | योजनेबद्दलचा शासन निर्णय | शासन निर्णय दिनांक 17.5.1984, 01.03.2011 व 11.09.2003 |
| ३ | योजनेचे स्वरूप | शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाच्या मुंबई, पुणे, लातूर, औरंगाबाद, नाशिक, कोल्हापुर, अमरावती, नागपूर व कोकण या विभागातील परीक्षेत गुणवान विद्यार्थ्यांची प्रतिवर्षी खालीलप्रमाणे निवड करण्यात येते.<br>१. सर्वसाधारण गुणवत्ता यादीमधून पहिले पाच विद्यार्थी (5)<br>२. गुणवत्तेनुसार पहिल्या तीन मुली (3)<br>३. गुणवत्तेनुसार मागासवर्गातील विद्यार्थ्यांमधून पहिले तिन विद्यार्थी (3)<br>प्रत्येक विभागात एकूण 11 याप्रमाणे 9 विभागीय मंडळातील विद्यार्थ्यांची एकूण संख्या 99. |
| ४ | योजनेचा उद्देश | गुणवान विद्यार्थांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे. |
| ५ | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | सर्व प्रवर्गासाठी |
| ६ | योजनेच्या प्रमुख अटी | १. माध्यमिक शालांत परीक्षेत वरचा क्रमांक मिळविणारे गुणवान विद्यार्थी सदर शिष्यवृत्ती साठी पात्र आहेत.<br>२. सदर योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता यादीच्या आधारे निवड पत्र पाठविण्यात येते. शिष्यवृत्तीसाठी अर्ज करतांना सदर पत्राची छायांकित प्रत अपलोड करणे आवश्यक आहे.<br>३. पात्र विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. संबंधित यादीमध्ये नाव असलेले विद्यार्थीच सदर शिष्यवृत्तीसाठी (Fresh) अर्ज करु शकतात.<br>४. सदर यादीतील महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर शिकत असलेले महाराष्ट्रीयन विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करू शकतात.<br>५. शिष्यवृत्ती पुढे चालू राहण्यासाठी विद्यार्थ्यांचे वर्तन, प्रगती समाधानकारक असणे आवश्यक आहे.<br>६. या योजनेचा लाभ घेत असतांना विद्यार्थ्याला केंद्र अथवा राज्य शासनाच्या इतर कोणत्याही शिष्यवृत्तीच्या अथवा सवलतीचा लाभ घेता येणार नाही.<br>मात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या बाबतीत ही अट लागू नाही, त्यांना केंद्र / राज्य शासनाच्या शिष्यवृत्ती / सवलती नुसार शिक्षण फी किंवा परीक्षा फी ची भरपाई होत असेल तर अशी शिक्षण फी किंवा परीक्षा फी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देय नाही.<br>तसेच राष्ट्रीय प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती घेणाऱ्या विद्यार्थ्यास सदर योजनेचा लाभ घेता येईल. मात्र राष्ट्रीय प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती नुसार मिळणाऱ्या पुस्तक अनुदानाची रक्कम वजा करून सदर शिष्यवृत्तीसाठी पुस्तक अनुदानाची रक्कम देय आहे.<br>७. गुणवान विद्यार्थ्यास एखाद्या वर्षी गुणाची टक्केवारी कमी असल्यास त्याचे त्यावर्षी आर्थिक सहाय्य स्थगीत ठेवण्यात येईल. पुढील वर्षी सदर विद्यार्थ्याने गुणाची अट पूर्ण केल्यास त्याचे सहाय्य सुरु करण्यात येईल.<br>८. मागील वर्षी सदर शिष्यवृत्ती चा लाभ घेतलेले विद्यार्थी शिष्यवृत्ती च्या नुतनीकरणासाठी अर्ज करु शकतात.<br>९. कनिष्ठ महाविद्यालय :- नुतनीकरनासाठी मागील वर्षात विद्यार्थांना किमान ५५ टक्के गुण आवश्यक.<br>१०. वरिष्ठ महाविद्यालय :- नुतनीकरनासाठी मागील वर्षात विद्यार्थांना किमान ६५ टक्के गुण आवश्यक.<br>११. नुतनीकरनासाठी विद्यार्थांनी मागील वर्षाचा Application ID चा उपयोग करावा. |

| | | |
|---|---|---|
| ७ | आवश्यक कागदपत्रे | १. मागील वर्षाची गुणपत्रिका.<br>२. चालू वर्षाची शुल्क भरल्याची पावती.<br>३. वसतिगृहाचे शुल्क भरल्याची पावती.<br>४. उच्च शिक्षण संचालनालयाकडील (DHE) शिष्यवृत्ती मंजूरीचे पत्र.<br>५. वैद्यकीय खर्चाबाबतची पावती (असल्यास) |
| ८ | दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप | सदर शिष्यवृत्तीसाठी खालीलप्रमाणे 11 प्रकारच्या शुल्काचा लाभ देण्यात येतो.<br>1. प्रवेश शुल्क - 100 टक्के<br>2. सत्र शुल्क - 100 टक्के<br>3. भोजन शुल्क - 150 रु. प्रतिमाह प्रमाणे दहा महिन्याकरिता = 1500 रु.<br>4. वैद्यकीय खर्च - विद्यार्थ्यांचा झालेला खर्च किंवा रु. 120 यापैकी जी रक्कम कमी असेल अशी रक्कम.<br>5. परीक्षा शुल्क - 100 टक्के<br>6. शिक्षण शुल्क - 100 टक्के<br>7. ग्रंथालय शुल्क - 100 टक्के<br>8. पुस्तके व इतर स्टेशनरी साहित्य -<br>a) 11 वी, 12 वी - 300 रु. वार्षिक<br>b) पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रम (science, veterinary and Agriculture अभ्यासक्रम वगळून) - 500 रु. वार्षिक<br>c) पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रम (science, veterinary and Agriculture अभ्यासक्रमासाठी) - 700 रु. वार्षिक<br>d) वैद्यकीय आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रम - 1000 रु. वार्षिक<br>e) पदवीका अभ्यासक्रम - 500 रु. वार्षिक<br>9. वसतीगृह शुल्क - 600 रु. वार्षिक<br>10. प्रयोगशाळा शुल्क - 100 टक्के<br>11. जिमखाना शुल्क - 100 टक्के<br>* शासनमान्य व अनुदानित कनिष्ठ महाविद्यालये / वरीष्ठ महाविद्यालये यामध्ये मान्य दराने आकारल्या जाणा-या फी ची प्रतिपूर्ती. विना अनुदानित पण शासनमान्य अशा अभियांत्रिकी / वैद्यकीय महाविद्यालयात अथवा तांत्रिक शिक्षण संस्थेत प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना अनुदानित अभियांत्रिकी / वैद्यकीय महाविद्यालये, तांत्रिक संस्था यामध्ये आकारल्या जाणा-या फीच्या दराने प्रतिपूर्ती करण्यात येते. |
| ९ | अर्ज करण्याची पध्दत | नवीन मंजूरीसाठी तसेच नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. |
| १० | ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ | www.mahadbtmahait.gov.in |

## २.गुणवान विद्यार्थांना आर्थिक सहाय्य (वरिष्ठ स्तर) (2202 3127)

| अ क्र | योजना | योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| १ | योजनेचे नाव | गुणवान विद्यार्थांना आर्थिक सहाय्य (वरिष्ठ स्तर) |
| २ | योजनेबद्दलचा शासन निर्णय | शासन निर्णय दिनांक 17.5.1984, 01.03.2011 व 11.09.2003 |
| ३ | योजनेचे स्वरुप | शासन निर्णयानुसार महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या मुंबई, पुणे, लातूर, औरंगाबाद, नाशिक, कोल्हापूर, अमरावती, नागपूर व कोकण या विभागातील परीक्षेत गुणवान विद्यार्थ्यांची प्रतिवर्षी खालीलप्रमाणे निवड करण्यात येते.<br>१. सर्वसाधारण गुणवत्ता यादीमधून पहिले पाच विद्यार्थी (5)<br>२. गुणवत्तेनुसार पहिल्या दोन मुली (2)<br>३. मागासवर्गातील विद्यार्थ्यांमधून पहिले दोन विद्यार्थी (2)<br>४. विज्ञान विद्याशाखेतील पहिले दोन विद्यार्थी (2)<br>५. कला विद्याशाखेतील पहिले दोन विद्यार्थी (2)<br>६. वाणिज्य विद्याशाखेतील पहिले दोन विद्यार्थी (2)<br>प्रत्येक विभागात एकूण 15 याप्रमाणे 9 विभागीय मंडळातील विद्यार्थ्यांची एकूण संख्या 135. |
| ४ | योजनेचा उद्देश | गुणवान विद्यार्थांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन देणे. |
| ५ | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | सर्व प्रवर्गासाठी |
| ६ | योजनेच्या प्रमुख अटी | 1 उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत वरचा क्रमांक मिळविणारे गुणवान विद्यार्थी सदर शिष्यवृत्ती साठी पात्र आहेत.<br>2 सदर योजनेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना गुणवत्ता यादीच्या आधारे निवड पत्र पाठविण्यात येते. शिष्यवृत्तीसाठी अर्ज करतांना सदर पत्राची छायांकित प्रत अपलोड करणे आवश्यक आहे.<br>3 पात्र विद्यार्थ्यांची यादी संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. संबंधित यादीमध्ये नाव असलेले विद्यार्थीच सदर शिष्यवृत्तीसाठी (Fresh) अर्ज करु शकतात.<br>4 सदर यादीतील महाराष्ट्र व महाराष्ट्राबाहेर शिकत असलेले महाराष्ट्रीयन विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करू शकतात.<br>5 शिष्यवृत्ती पुढे चालू राहण्यासाठी विद्यार्थ्यांचे वर्तन, प्रगती समाधानकारक असणे आवश्यक आहे.<br>6 या योजनेचा लाभ घेत असतांना विद्यार्थ्याला केंद्र अथवा राज्य शासनाच्या इतर कोणत्याही शिष्यवृत्तीच्या अथवा सवलतीचा लाभ घेता येणार नाही,<br>मात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या बाबतीत ही अट लागू नाही, त्यांना केंद्र / राज्य शासनाच्या शिष्यवृत्ती / सवलती नुसार शिक्षण फी किंवा परीक्षा फी ची भरपाई होत असेल तर अशी शिक्षण फी किंवा परीक्षा फी मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देय नाही.<br>तसेच राष्ट्रीय प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती घेणाऱ्या विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ घेता येईल. मात्र राष्ट्रीय प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती नुसार मिळणाऱ्या पुस्तक अनुदानाची रक्कम वजा करून सदर शिष्यवृत्तीसाठी पुस्तक अनुदानाची रक्कम देय आहे.<br>7 गुणवान विद्यार्थ्यास एखाद्या वर्षी गुणाची टक्केवारी कमी असल्यास त्याचे त्यावर्षी आर्थिक सहाय्य स्थगीत ठेवण्यात येईल. पुढील वर्षी सदर विद्यार्थ्यास गुणाची अट पूर्ण केल्यास त्याचे आर्थिक सहाय्य सुरु करण्यात येईल.<br>8 मागील वर्षी सदर शिष्यवृत्ती चा लाभ घेतलेले विद्यार्थी शिष्यवृत्ती च्या नुतनीकरणासाठी अर्ज करू शकतात.<br>9 वरिष्ठ महाविद्यालय :- नुतनीकरनासाठी मागील वर्षात विद्यार्थ्यांना किमान ६५ टक्के गुण आवश्यक.<br>10 नुतनीकरनासाठी विद्यार्थ्यांनी मागील वर्षाचा Application ID चा उपयोग करावा. |

| | | |
|---|---|---|
| ७ | आवश्यक कागदपत्रे | 1. मागील वर्षाची गुणपत्रिका.<br>2. चालू वर्षाची शुल्क भरल्याची पावती.<br>3. वसतिगृहाचे शुल्क भरल्याची पावती.<br>4. उच्च शिक्षण संचालनालयाकडील (DHE) शिष्यवृत्ती मंजूरीचे पत्र.<br>5. वैद्यकीय खर्चाबाबतची पावती (असल्यास) |
| ८ | दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप | सदर शिष्यवृत्तीसाठी खालीलप्रमाणे 11 प्रकारच्या शुल्काचा लाभ देण्यात येतो.<br>1. प्रवेश शुल्क - 100 टक्के<br>2. सत्र शुल्क - 100 टक्के<br>3. भोजन शुल्क - 150 रु. प्रतिमाह प्रमाणे दहा महिन्याकरिता = 1500 रु.<br>4. वैद्यकीय खर्च - विद्यार्थ्यांचा झालेला खर्च किंवा रु. 120 यापेकी जी रक्कम कमी असेल अशी रक्कम.<br>5. परीक्षा शुल्क - 100 टक्के<br>6. शिक्षण शुल्क - 100 टक्के<br>7. ग्रंथालय शुल्क - 100 टक्के<br>8. पुस्तके व इतर स्टेशनरी साहित्य -<br>a) 11 वी, 12 वी - 300 रु. वार्षिक<br>b) पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रम (science, veterinary and Agriculture अभ्यासक्रम वगळून) - 500 रु. वार्षिक<br>c) पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रम (science, veterinary and Agriculture अभ्यासक्रमासाठी) - 700 रु. वार्षिक<br>d) वैद्यकीय आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रम - 1000 रु. वार्षिक<br>e) पदवीका अभ्यासक्रम - 500 रु. वार्षिक<br>9. वसतीगृह शुल्क - 600 रु. वार्षिक<br>10. प्रयोगशाळा शुल्क - 100 टक्के<br>11. जिमखाना शुल्क - 100 टक्के<br>* शासनमान्य व अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये यामध्ये मान्य दराने आकारल्या जाणा-या फी ची प्रतिपूर्ती. विना अनुदानित पण शासनमान्य अशा अभियांत्रिकी / वैद्यकीय महाविद्यालयात अथवा तांत्रिक शिक्षण संस्थेत प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना अनुदानित अभियांत्रिकी / वैद्यकीय महाविद्यालये, तांत्रिक संस्था यामध्ये आकारल्या जाणा-या फीच्या दराने प्रतिपूर्ती करण्यात येते. |
| ९ | अर्ज करण्याची पध्दत | नवीन मंजूरीसाठी तसेच नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. |
| १० | ऑनलाइन अर्ज करण्याचे संकेतस्थळ | www.mahadbtmahait.gov.in |

## ३. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना - (2202 I666)

| अ.क्र. | योजना | योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| 1 | योजनेचे नाव | डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना |
| 2 | योजने बद्दलचा शासन निर्णय | शासन निर्णय दिनांक 7.10.2017, दिनांक 22.02.2018, दिनांक 11.7.2019,दि. 05.01.2024. |
| 3 | योजनेचा स्वरूप | उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय / अशासकीय अनुदानित / अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान- विना अनुदान) / कायम विनाअनुदानित महाविद्यालयामध्ये व अकृषी विद्यापीठे व त्या विद्यापीठा अंतर्गत असलेल्या उपकेंद्रामधील (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यीत खाजगी विद्यापीठे वगळून) व्यावसायीक व बिगर व्यावसायीक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरीता वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेचा लाभ देय आहे. |
| 4 | योजनेचा उद्देश | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकरीता वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेचा लाभ देणे. |
| 5 | योजना ज्या प्रवर्गासाठी लागु आहे त्याचे नाव | सदर योजना बिगर आरक्षित प्रवर्ग तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागु राहील. |
| 6 | योजनेच्या प्रमुख अटी | १. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेस पात्र विद्यार्थी सदर योजनेसाठीही अर्ज करण्यास पात्र आहेत.<br>२. विद्यार्थ्याने शासकीय / निमशासकीय / खाजगी वसतिगृहामध्ये प्रवेश घेतला असल्यास त्या विद्यार्थ्याने त्याबाबतचा पुरावा अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.<br>३. तसेच खाजगी मालकीच्या घरामध्ये विद्यार्थ्याने स्वतःची राहण्याची सोय केली असल्यास अशा विद्यार्थ्यास नोंदणीकृत अथवा नोटराईज्ड भाडे कराराची प्रत अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे.<br>४. एखाद्या विद्यार्थ्याने सामान्य रहिवासी असलेल्या त्याच्या गावातील / शहरातील संस्थेमध्ये अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतल्यास त्यास निर्वाह भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.<br>५. सदर योजनेचा लाभ हा कुटुंबातील केवळ दोन अपत्यांपर्यंत मर्यादित आहे.<br>६. एखाद्या विद्यार्थ्यास अन्य कोणत्याही योजनेखाली निर्वाह भत्ता मिळत असल्यास असा विद्यार्थी या योजनेखाली लाभ मिळण्यास अपात्र आहे.<br>७. विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमाच्या कालावधीकरीताच निर्वाहभत्ता देण्यात येतो. तथापि एखादा विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास अथवा काही कारणांमुळे त्याला वरच्या वर्गात प्रवेश न मिळाल्यास त्यास त्या वर्षापुरता निर्वाह भत्ता लाभ अनुज्ञेय नाही.<br>८. या योजनेअंतर्गत रुपये 1.00 लाखपर्यंत उत्पन्न असलेल्या विद्यार्थ्यांकरीता निर्वाहभत्त्याचा लाभ देण्याकरीता संख्येची कोणतीही मर्यादा असणार नाही. मात्र रुपये 1.00 लाख ते रुपये 8.00 लाख उत्पन्न मर्यादा असलेल्या व व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता प्रत्येक जिल्ह्यासाठी लाभार्थी विद्यार्थ्यांची कमाल संख्या 500 इतकी निश्चित करण्यात येत आहे. त्यापैकी 33 टक्के इतक्या जागा विद्यार्थिनींकरीता राखीव ठेवण्यात येतात. तथापि पुरेशा विद्यार्थिनी उपलब्ध न झाल्यास रिक्त राहणाऱ्या जागा त्याच जिल्ह्यातील विद्यार्थ्यांकरीता उपयोगात आणता येतात.<br>९. प्रत्येक जिल्ह्यातील कोटा हा प्राप्त होणाऱ्या अर्जांच्या संख्येनुसार प्रमाणशीररित्या (Proportionate) निश्चित करण्यात येतो. |
| 7 | आवश्यक कागदपत्रे | १. सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.<br>२. पालकांचे अल्पभूधारक शेतकरी / नोंदणीकृत मजूर असलेबाबतचे प्रमाणपत्र किंवा<br>शैक्षणिक वर्षाच्या लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षाचे संबंधित तहसिलदार अथवा सक्षम अधिकाऱ्याने दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.<br>३. CAP संबंधित कागदपत्रे. (केवळ विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र अभ्यासक्रम)<br>४. गॅप संबंधित दस्तऐवज (गॅप असल्यास)<br>५. दोन मुलांचे कुटुंब घोषणापत्र. |

शासन निर्णय दिनांक 7.10.2017, दिनांक 22.02.2018, दिनांक 11.7.2019 नुसार डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत निर्वाह भत्ता पात्र विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

8 दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरुप

| अ.क्र. | प्रकार | कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न मर्यादा | वसतिगृह ठिकाण | अभ्यासक्रमांसाठी निर्वाह भत्याची रक्कम | प्रत्येक जिल्ह्यासाठी संच |
|---|---|---|---|---|---|
| | | | व्यावसायिक अभ्यासक्रम | | |
| 01 | ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर आहेत. | निरंक | मुंबई, पुणे महानगर प्रादेशिक क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर इ. | रु. 30,000/- | अमर्याद |
| | | | इतर शहरे / ग्रामीण भागासाठी | रु. 20,000/- | |
| 02 | इतर विद्यार्थ्यांसाठी | रु. 1.00 लाखापर्यंत | मुंबई, पुणे महानगर प्रादेशिक क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर इ. | रु. 10,000/- | अमर्याद |
| | | | इतर शहरे / ग्रामीण भागासाठी | रु. 8,000/- | |
| 03 | इतर विद्यार्थ्यांसाठी | रु. 1.00 लाख ते रु. 8.00 लाख | मुंबई, पुणे महानगर प्रादेशिक क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर इ. | रु. 10,000/- | 500<br>33% महिलांसाठी राखीव |
| | | | इतर शहरे / ग्रामीण भागासाठी | रु. 8,000/- | |
| | | | बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम | | |
| 04 | विद्यार्थी | रु. 1.00 लाखापर्यंत | - | रु. 2,000/- | |

शासन निर्णय दि. 05.01.2024 नुसार, डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष 2023-24 पासून खालील सुधारीत दराने निर्वाह भत्ता पात्र विद्यार्थ्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

| अ. क्र. | भत्ता | मुंबई शहर, मुंबई उपनगर, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी चिंचवड, नागपूर या शहरात उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी | इतर महसुली विभागीय शहरतील व उर्वरित क वर्ग महानगरपालिका क्षेत्रामध्ये उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी. | इतर जिल्ह्यांच्या ठिकाणी उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी | तालुका ठिकाणी उच्च शिक्षण घेणारे विद्यार्थी |
|---|---|---|---|---|---|
| १ | भोजन भत्ता | ३२,०००/- | २८,०००/- | २५,०००/- | २३,०००/- |
| २ | निवास भत्ता | २०,०००/- | १५,०००/- | १२,०००/- | १०,०००/- |
| ३ | निर्वाह भत्ता | ८,०००/- | ८,०००/- | ६,०००/- | ५,०००/- |
| | एकूण रक्कम | ६०,०००/- | ५१,०००/- | ४३,०००/- | ३८,०००/- |

| | | |
|---|---|---|
| 9 | अर्ज करण्याची पध्दत | नवीन मंजूरीसाठी तसेच नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. |
| 10 | ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ | www.mahadbtmahait.gov.in |

## ४.स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य - (2202 2695)

| अ क्र | योजना | योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| १ | योजनेचे नाव | स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |
| २ | योजनेबद्दलचा शासन निर्णय | शासन निर्णय दिनांक 23.11.1965, दिनांक 13.09.1994 |
| ३ | योजनेचे स्वरूप | सदर योजनेंतर्गत राज्यातील मान्यता प्राप्त अनुदानित शैक्षणिक संस्थेत पदवी व पदव्युत्तर स्तरावर शिक्षण घेणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलतींचा लाभ देण्यात येतो. |
| ४ | योजनेचा उद्देश | राज्यातील मान्यता प्राप्त अनुदानित शैक्षणिक संस्थेत पदवी व पदव्युत्तर स्तरावर शिक्षण घेणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलतींचा लाभ देणे. |
| ५ | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | सर्व प्रवर्गासाठी |
| ६ | योजनेच्या प्रमुख अटी | 1) अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.<br>2) अर्जदार स्वातंत्र्य सैनिकांचा पाल्य असणे आवश्यक आहे.<br>3) स्वातंत्र्य सैनिकांच्या पाल्यांना म्हणजेच स्वातंत्र्य सैनिकांचे पत्नी, मुले (दत्तक आणि सावत्र) आणि नातवंड (मृत्यु पावलेल्या मुलांची मुले) या योजनेसाठी अर्ज करू शकतात.<br>4) सदर योजनेचा लाभ राज्यातील शासकीय / अशासकीय अनुदानित महाविद्यालयामधील अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच देय आहे.<br>5) महाराष्ट्र राज्याच्या बाहेर शिकत असलेले महाराष्ट्रातील विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करू शकत नाहीत.<br>6) या सवलती समाधानकारक प्रगती, चांगली वर्तणूक व नियमित उपस्थिती असल्यास विहित अभ्यासक्रम संपेपर्यंत चालू राहतील.<br>7) मागील वर्षी सदर शिष्यवृत्ती चा लाभ घेतलेले विद्यार्थी शिष्यवृत्ती च्या नूतनीकरणासाठी अर्ज करू शकतात. |
| ७ | आवश्यक कागदपत्रे | 1 सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र<br>2. मागील वर्षाची गुणपत्रीका.<br>3. बोनाफाईड सर्टिफिकेट<br>4. स्वातंत्र्य सैनिकाला ज्याठिकाणी कारावासाची शिक्षा झालेली आहे त्या जिल्हयातील दंडाधिकाऱ्याचे प्रमाणपत्र |
| ८ | दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप | सदर सवलती अंतर्गत खालील प्रमाणे लाभ देण्यात येतो.<br>1. प्रवेश शुल्क - 100 टक्के<br>2. सत्र शुल्क - 100 टक्के<br>3. ग्रंथालय शुल्क -100 टक्के<br>4. प्रयोगशाळा शुल्क - 100 टक्के<br>5. शिक्षण शुल्क - लाभार्थी विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काची रक्कम महाविद्यालयांकडून आकारली जात नाही. तसेच संबंधित महाविद्यालयास सदरची रक्कम देण्यात येत नाही. (सदर शिष्यवृत्तीसाठी केवळ शासकीय, अनुदानित महाविद्यालयांतील विद्यार्थीच पात्र आहेत.)<br>6. इतर शिष्यवृत्ती रक्कम -<br>a) पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम (अभियांत्रिकी अभ्यासक्रम वगळून) - 50 रु. वार्षिक<br>b) पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम (अभियांत्रिकी अभ्यासक्रम) — 60 रु. वार्षिक<br>7. पुस्तके व इतर खर्च -<br>a) पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम (अभियांत्रिकी अभ्यासक्रम वगळून) - 200 रु. वार्षिक<br>b) पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम (अभियांत्रिकी अभ्यासक्रम) - 400 रु. वार्षिक |
| ९ | अर्ज करण्याची पध्दत | नवीन मंजुरी व नूतनीकरण यासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. |
| १० | ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ | www.mahadbtmahait.gov.in |

# ५.माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य - (2202 2712)

| अ क्र | योजना | योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| १ | योजनेचे नाव | माजी सैनिकांच्या पाल्यांना आर्थिक सहाय्य |
| २ | योजनेबद्दलचा शासन निर्णय | शासन निर्णय दिनांक 14.01.1985, दिनांक 13.09.1994 |
| ३ | योजनेचे स्वरूप | सदर योजनेंतर्गत राज्यातील मान्यता प्राप्त व अनुदानित शैक्षणिक संस्थेत पदवी व पदव्युत्तर स्तरावर शिक्षण घेणाऱ्या माजी सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलतीचा लाभ देण्यात येतो. सदर शिष्यवृत्तीसाठी केवळ शासकीय, अनुदानित महाविद्यालयांतील विद्यार्थीच पात्र आहेत. |
| ४ | योजनेचा उद्देश | राज्यातील मान्यता प्राप्त व अनुदानित शैक्षणिक संस्थेत पदवी व पदव्युत्तर स्तरावर शिक्षण घेणाऱ्या माजी सैनिकांच्या पाल्यांना शैक्षणिक सवलतीचा लाभ देणे. |
| ५ | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | सर्व प्रवर्गासाठी |
| ६ | योजनेच्या प्रमुख अटी | 1 महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र धारण करणाऱ्या किंवा महाराष्ट्रात भरती झालेल्या मेजर, नौदल वा वायु दलातील तत्सम दर्जाच्या हुद्यापर्यंत (वा त्यापेक्षा कमी दर्जाच्या हुद्यावरुन) सेवेतून निवृत्त झालेल्या माजी सैनिकांच्या मुलांना/मुलींना, पत्नींना/विधवांना या योजनेखाली शैक्षणिक सवलती देय आहेत.<br>2 वार्षिक परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यास अथवा वरच्या वर्गात पदोन्नत न झाल्यास या सवलती स्थगीत ठेवण्यात येतील. मात्र जर नंतर विद्यार्थी वरच्या वर्गात पदोन्नत झाला की त्यास ही सवलत पुढे चालू ठेवण्यात येईल<br>3 या सवलतीचा लाभ घेणाऱ्या व्यक्तीस अन्य दुसऱ्या योजनेखाली फी माफी, पुस्तक अनुदान, गणवेश अनुदान इत्यादी सवलतींचा लाभ या सवलती बरोबर घेता येणार नाही. तसेच एकाच वेळी एका विद्यार्थ्याला एका पेक्षा जास्त अभ्यासक्रमांना या सवलतीचा लाभ दिला जाणार नाही.<br>4 केवळ शासकीय, अनुदानित महाविद्यालयांमधील अभ्यासक्रमास प्रवेश घेणारे विद्यार्थीच अर्ज करण्यास पात्र आहेत.<br>5 महाराष्ट्रा बाहेर शिकत असलेले महाराष्ट्रातील विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करू शकत नाहीत.<br>6 या सवलती समाधानकारक प्रगती, चांगली वर्तणूक व नियमित उपस्थिती असल्यास विहित अभ्यासक्रम संपेपर्यंत चालू राहतील.<br>7 नूतनीकरनासाठी विद्यार्थांनी मागील वर्षीच्या Application ID चा उपयोग करावा. |
| ७ | आवश्यक कागदपत्रे | 1. महाराष्ट्र राज्याचे अधिवास प्रमाणपत्र किंवा पालकांचे माजी सैनिकाचे महाराष्ट्रात भरती / सेवानिवृत्त झालेबाबतचे प्रमाणपत्र.<br>2. डी.एस.एस.ए.बोर्ड/सी.एस.एस.ए.बोर्ड यांचे महाराष्ट्र राज्याचे अधिकार पत्र धारण करीत असल्याचे किंवा महाराष्ट्रात भरती झाल्याचे व मेजर व नौदल आणि वायुदलातील तत्सम दर्जाच्या हुद्दापर्यंत वा (या हुद्दापेक्षा कमी हुद्दावरुन) निवृत्त माजी सैनिक असल्याचे प्रमाणपत्र.<br>3. मागील वर्षाची गुणपत्रीका. |
| ८ | दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप | 1. प्रवेश शुल्क - 100 टक्के<br>2. सत्र शुल्क - 100 टक्के<br>3. ग्रंथालय शुल्क -100 टक्के<br>4. प्रयोगशाळा शुल्क - 100 टक्के<br>5. शिक्षण शुल्क - लाभार्थी विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काची रक्कम महाविद्यालयांकडून आकारली जात नाही. तसेच संबंधित महाविद्यालयास सदरची रक्कम देण्यात येत नाही. |
| ९ | अर्ज करण्याची पध्दत | नवीन मंजुरी व नूतनीकरण यासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. |
| १० | ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ | www.mahadbtmahait.gov.in |

## ६.एकलव्य आर्थिक सहाय्य योजना-(2202 2828)

| अ क्र | योजना | योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| १ | योजनेचे नाव | एकलव्य आर्थिक सहाय्य योजना |
| २ | योजनेबद्दलचा शासन निर्णय | शासन निर्णय दिनांक 07.02.1996 |
| ३ | योजनेचे स्वरूप | राज्य शासनाकडुन होतकरु व गरिब विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करता यावे यासाठी एकलव्य आर्थिक सहाय्य योजना सुरु करण्यात आलेली आहे. |
| ४ | योजनेचा उद्देश | होतकरु व गरिब विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करता यावे यासाठी सहाय्य करणे. |
| ५ | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | सर्व प्रवर्गासाठी |
| ६ | योजनेच्या प्रमुख अटी | १ कला , वाणिज्य , विधी व शिक्षणशास्त्र शाखेमध्ये पदवी अभ्यासक्रमामध्ये किमान 60 टक्के व विज्ञान शाखेमध्ये पदवी अभ्यासक्रमामध्ये किमान 70 टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.<br>२. विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. 75,000/- किंवा त्यापेक्षा कमी असावे.<br>३ विद्यार्थी हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.<br>४. संबंधित लाभार्थी विद्यार्थी कुठेही पूर्णवेळ नोकरी करणारा नसावा.<br>५. शिष्यवृत्ती घेणारा विद्यार्थी शुल्क माफीच्या सवलतीस पात्र राहील.<br>६ अर्धवेळ अभ्यासक्रमाचा विद्यार्थी या शिष्यवृत्तीसाठी पात्र राहणार नाही.<br>७. बी.एड. प्रशिक्षण अभ्यासक्रम तसेच एम.फील व पी.एच.डी व तत्सम अभ्यासक्रमासाठी ही योजना लागू नाही.<br>८. सदर शिष्यवृत्ती मंजुर झाल्यास इतर केंद्र / राज्य शासनाच्या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेता येणार नाही .<br>९. महाराष्ट्र राज्याच्या बाहेर शिकत असलेले महाराष्ट्रातील विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करू शकत नाहीत<br>१०. नियमित उपस्थिती 75 टक्के असणे आवश्यक आहे.<br>११. नुतनीकरनासाठी पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या पहिल्या वर्षी किमान 50 टक्के गुण असणे आवश्यक आहे.<br>१२. नूतनीकरनासाठी विद्यार्थाने मागील वर्षीच्या Application ID चा उपयोग करावा. |
| ७ | आवश्यक कागदपत्रे | १. सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.<br>२. शैक्षणिक वर्षाच्या लगतपूर्वीच्या वित्तीय वर्षाचे संबंधित तहसिलदार अथवा सक्षम अधिकाऱ्याने दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.<br>३. मागील वर्षाची गुणपत्रिका जोडणे आवश्यक आहे .<br>४. नुतनीकरणासाठी उपस्थिती प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. |
| ८ | दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप | सदर शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या विद्यार्थांना प्रतिवर्ष रु 5000/- प्रमाणे शिष्यवृत्ती देण्यात येते. |
| ९ | अर्ज करण्याची पध्दत | नवीन मंजूरीसाठी तसेच नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. |
| १० | ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ | www.mahadbtmahait.gov.in |

## ७.शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती-(2202 H091)

| अ क्र | योजना | योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| १ | योजनेचे नाव | शासकीय संशोधन अधिछात्रवृत्ती |
| २ | योजनेबद्दलचा शासन निर्णय | शासन निर्णय दिनांक 13.08.1985, दिनांक 5.02.2004 |
| ३ | योजनेचे स्वरूप | राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयामध्ये पी.एच.डी. करता यावी. या उद्देशाने ही योजना सुरु करण्यात आलेली आहे.<br>सदर योजनेसाठी खालीलप्रमाणे 14 संच मंजूर आहेत. |

| अ क्र | शासकीय संस्था / महाविद्यालयाचे नांव | संच |
|---|---|---|
| 01 | शासकीय विज्ञान संस्था मुंबई | 03 |
| 02 | शासकीय विज्ञान संस्था नागपूर | 03 |
| 03 | शासकीय विज्ञान संस्था औरंगाबाद | 03 |
| 04 | शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती | 01 |
| 05 | वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था नागपूर | 01 |
| 06 | राज्यातील अकृषी विद्यापीठे व संल्गिनत महाविद्यालये यामधील विद्यार्थांसाठी | 03 |
| | एकूण | 14 |

| अ क्र | योजना | योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| ४ | योजनेचा उद्देश | राज्यातील विद्यापीठीय व महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांना त्यांच्या विषयामध्ये पी.एच.डी. करता यावी. |
| ५ | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | सर्व प्रवर्गासाठी योजना लागू आहे. |
| ६ | योजनेच्या प्रमुख अटी | १. विद्यार्थी हा महाराष्ट्राचा रहिवासी असणे आवश्यक आहे.<br>२. संबंधित छात्र कोठेही सेवेत नसावा. तसेच **इतर** कोणतीही शिष्यवृत्ती अथवा विद्यावेतन स्विकारता येणार नाही.<br>३. संबंधित विद्यार्थ्याने पीएच.डी. **साठी** विद्यापीठामध्ये रीतसर नोंदणी **करून** संबंधित मार्गदर्शकाने शिफारस **करणे** आवश्यक **आहे.**<br>४. विद्यार्थ्याने **जो विषय निवडला** असेल **त्या** विषयासाठी विद्यापीठाने **मान्यता** दिलेल्या मार्गदर्शकाच्या मार्गदर्शनाखाली **पूर्ण** वेळ संशोधन कार्य **करावे** लागेल.<br>५. अधिछात्रवृत्तीचा कालावधी 3 वर्षाचा राहिल.<br>६. **सदर** शिष्यवृत्ती **चे राज्य स्तरावर** 3 **व** महाविद्यालयीन स्तरावर 11 संच आहेत.<br>७. **या** शिष्यवृत्तीसाठी **उत्पन्न** मर्यादा नाही.<br>८. ज्या विद्यार्थांनी पदवी (बी.ए. / बीएससी / बीएड) आणि पदव्युत्तर (एम.ए. / एमएससी / एम.एड.) यापैकी कोणत्याही एका पदवी परीक्षेत किमान 60 टक्के **(प्रथम श्रेणी ) गुण प्राप्त केले** आहेत **व अन्य पदवी परीक्षेत** 55 टक्के (द्वितीय **श्रेणी ) गुण प्राप्त** केली **आहेत, असे** विद्यार्थी **अर्ज** करण्यास **पात्र** आहेत.<br>तथापि एखाद्या वर्षी वरील अट पूर्ण करणारे विद्यार्थी उपलब्ध नसतील तर त्या वर्षी ज्या विद्यार्थाने पदवी व पदव्युत्तर स्तरावर द्वितीय श्रेणी (55 टक्के) गुण प्राप्त केली आहे असे विद्यार्थी पात्र समजले जातील. |

| | | |
|---|---|---|
| | | ९. सदर शिष्यवृत्ती साठी केवळ (बी.ए. / बीएससी / बीएड) आणि पदव्युत्तर (एम.ए. / एमएससी / एम.एड.) हे अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेले विद्यार्थीच अर्ज करू शकतात.<br>१०. महाराष्ट्र राज्याच्या बाहेर शिकत असलेले महाराष्ट्रातील विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करू शकत नाहीत.<br>११. या सवलती समाधानकारक प्रगती, चांगली वर्तणूक व नियमित उपस्थिती असल्यास विहित अभ्यासक्रम संपेपर्यंत चालू राहतील.<br>१२. नुतनीकरनासाठी विद्यार्थ्यांने मागील वर्षीच्या अर्जाच्या Application ID चा उपयोग करावा. |
| ७ | आवश्यक कागदपत्रे | १. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.<br>२. मार्गदर्शकासाठी विद्यापीठाचे मान्यता पत्र.<br>३. पीएच.डी. मार्गदर्शक यांचे, विद्यार्थी त्यांचेकडे पीएच.डी. करीत असल्याबाबतचे प्रमाणपत्र.<br>४. पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम गुणपत्रिका.<br>५. नुतनीकरणासाठी मागील वर्षाचा मार्गदर्शकाने दिलेला प्रगती अहवाल. |
| ८ | दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप | सदर योजनेसाठी पात्र विद्यार्थ्यास प्रति माह 750 प्रमाणे रक्कम रु. 7500/- व रु 1000/- वार्षिक सादीलवार खर्च हे लाभ देण्यात येतात. |
| ९ | अर्ज करण्याची पध्दत | नवीन मंजूरीसाठी तसेच नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. |
| १० | ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ | www.mahadbtmahait.gov.in |

# ८.शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती-(2202 0932)

| अ क्र | योजना | योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| १ | योजनेचे नाव | शासकीय विद्यानिकेतन शिष्यवृत्ती |
| २ | योजनेबद्दलचा शासन निर्णय | शासन निर्णय दिनांक 02.09.1986 |
| ३ | योजनेचे स्वरूप | राज्यातील शासकीय विद्यानिकेतन यामधुन शालांत प्रमाणपत्र परीक्षा (10वी) उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी विद्यानिकेतन शिष्यवृत्ती दिली जाते.<br>सदर योजनेसाठी शासकीय विद्यानिकेतन पुसेगांव, अमरावती, औरंगाबाद, व धुळे यांचेकरिता प्रत्येकी 20 प्रमाणे एकुण 80 संच मंजूर आहे. |
| ४ | योजनेचा उद्देश | शासकीय विद्यानिकेतन यामधुन शालांत प्रमाणपत्र परीक्षा (10वी) उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी सहाय्य करणे. |
| ५ | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | सर्व प्रवर्गासाठी |
| ६ | योजनेच्या प्रमुख अटी | १. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.<br>२. शासकीय विद्यानिकेतन पुसेगांव, अमरावती, औरंगाबाद, व धुळे मधून इयत्ता 10 वी च्या वर्गात 60% गुण मिळवणे आवश्यक आहे.<br>३. महाराष्ट्र राज्याच्या बाहेर शिकत असलेले महाराष्ट्रातील विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करू शकत नाहीत.<br>४. या सवलती समाधानकारक प्रगती, चांगली वर्तणूक व नियमित उपस्थिती असल्यास विहित अभ्यासक्रम संपेपर्यंत चालू राहतील.<br>५. मागील वर्षी सदर शिष्यवृत्ती चा लाभ घेतलेले विद्यार्थी शिष्यवृत्ती च्या नूतनीकरणासाठी अर्ज करू शकतात. |
| ७ | आवश्यक कागदपत्रे | 1) सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र<br>2) मागील वर्षाची गुणपत्रिका.<br>3) बोनाफाईड प्रमाणपत्र<br>4) शासकीय विद्यानिकेतनाद्वारे प्राप्त इन्टायटलमेंट कार्ड. |
| ८ | दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप | 1. इ . 10 वी 12 वी प्रतिमाह 100 प्रमाणे रक्कम रू. 1000/-<br>2. पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी प्रतिमाह 150 प्रमाणे रक्कम रु. 1500/-<br>उमेदवारांची निवड मेरिटच्या आधारावर आहे. |
| ९ | अर्ज करण्याची पध्दत | नवीन मंजूरीसाठी तसेच नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. |
| १० | ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ | www.mahadbtmahait.gov.in |

# ९.जवाहरलाल नेहरू विद्यापीठ शिष्यवृत्ती - (2202 0941)

| अ क्र | योजना | योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| १ | योजनेचे नाव | जवाहरलाल नेहरू विद्यापीठ शिष्यवृत्ती |
| २ | योजनेबद्दलचा शासन निर्णय | शासन निर्णय दिनांक 07.05.1983, दिनांक 05.02.2004 |
| ३ | योजनेचे स्वरूप | जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, नवी दिल्ली यांचे कडून विहित नियमानुसार त्या विद्यापीठात शिकत असलेल्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांमधून एका विद्यार्थ्याची सदर शिष्यवृत्ती साठी निवड केली जाते. जवाहरलाल नेहरु विद्यापीठाने निवड केल्यानुसार विद्यार्थ्यास महाराष्ट्र शासनाची मंजुरी घेतल्यानंतर सदर शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. |
| ४ | योजनेचा उद्देश | जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, नवी दिल्ली या विद्यापीठामध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी सहाय्य करणे. |
| ५ | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | सर्व प्रवर्गासाठी |
| ६ | योजनेच्या प्रमुख अटी | १. महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.<br>२. जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, नवी दिल्ली यांचे कडून विहित नियमानुसार त्यांचे विद्यापीठात शिकत असलेल्या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांमधून एका निवड केलेल्या विद्यार्थ्यास महाराष्ट्र शासनाची मंजुरी घेऊन सदर शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते.<br>३. संशोधन-अभ्यासक्रमास जवाहरलाल नेहरू विद्यापीठ नवी दिल्ली येथे प्रवेश घेतलेले विद्यार्थी या योजनेसाठी पात्र आहेत.<br>४. नुतनीकरनासाठी जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, नवी दिल्ली यांचेकडील वार्षिक प्रगती अहवाल. |
| ७ | आवश्यक कागदपत्रे | 1. सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र<br>2. मागील वर्षाची गुणपत्रिका<br>3. नुतनीकरणासाठी जवाहरलाल नेहरु विद्यापीठ, नवी दिल्ली यांचेकडील वार्षिक प्रगती अहवाल. |
| ८ | दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप | सदर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विद्यार्थास दरमहा रु. 8000/- व रु. 10000/- वार्षिक सादीलवार खर्च अशी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. |
| ९ | अर्ज करण्याची पध्दत | नवीन मंजूरीसाठी तसेच नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. |
| १० | ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ | www.mahadbtmahait.gov.in |

# १०-राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना (2202 1456)

| अ.क्र | शासन निर्णय | योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| १ | उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दिनांक:<br>07.10.2017,<br>31.03.2018,<br>07.08.2018,<br>11.07.2019,<br>08.07.2024,<br>10-10-2024 | उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय दिनांक 07.10.2017, 31.03.2018 ,07.08.2018, 11.7.2019, 08.07.24, व 10-10-2024 अन्वये राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी सहाय्य केले जाते.<br>सदर योजना बिगर आरक्षित प्रवर्ग तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातून प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना लागू राहील.<br>**सदर शिष्यवृत्तीसाठी पात्रता खालीलप्रमाणे आहे.**<br>१) अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा. तथापि महाराष्ट्र- कर्नाटक राज्य सीमा भागातील विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज सरू शकतात.<br>२) अर्जदाराच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु. ८ लाख किंवा त्यापेक्षा कमी असणे आवश्यक आहे.<br>३) शासन निर्णय दिनांक ०७/१०/२०१७ (डीएचई अभ्यासक्रम) मधील अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेले विद्यार्थी अर्ज करू शकतात.<br>४) शासन निर्णयानुसार प्रथम दोन मुले या योजनेसाठी पात्र आहेत.<br>५)अर्जदाराने इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा लाभ घेतलेला नसावा.<br>६) या योजनेचा लाभ दुरस्थ पद्धतीने (Open /Distance/Virtual learning)अथवा अर्धवेळ स्वरुपात चालविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळणार नाही.<br>७) तसेच योजनेच्या लाभाकरीता अनुज्ञेय असलेला अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाची व संबंधित सक्षम संस्थाची (AICTE/PCI/COA/MCI/NCTE, विद्यापिठ / शिक्षण मंडळ, इ.) पूर्व मान्यता व संलग्नता असणे आवश्यक राहिल.<br>८)अर्जदार विद्यार्थ्यां प्रत्येक सत्र अथवा वर्षाची परीक्षा देणे आवश्यक राहिल.<br>९) मागील वर्षी सदर शिष्यवृत्तीचा लाभ घेतलेला विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या नुतनीकरणासाठी अर्ज करू शकतात.<br><br>दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरुप शासन निर्णय दिनांक ०८.०७.२०२४ नुसार-- |

**A) Tuition Fees :-**

| Income Limit | Courses | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Government | Non Government Aided | Partially Aided / UnAided | Permanent Unaided |
| **Professional Courses** | | | | | |
| Up to Rs. २.५० Lakh | Girl with professional course | १००% | १००% | १००% | १००% |
| | Boy | १००% | १००% | ५०% | ५०% |
| २.५० Up to Rs. ८ Lakh | Girl with professional course | १००% | १००% | १००% | १००% |
| | Boy | ५०% | ५०% | ५०% | ५०% |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Non Professional Course | | | | | |
| Up to Rs. ८ Lakh | Girl with non-professional course | १००% | १००% | १००% | १००% |
| | Boy | १००% | १००% | १००% | १००% |
| B) Exam Fees :- | | | | | |
| Professional Course | Girl with professional course | १००% | | | |
| | Boy | ५०% | | | |
| Non professional course | Girl with non-professional course | १००% | | | |
| | Boy | १००% | | | |

**उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण योजना**

शासन निर्णय दि. ७.१०.२०१७ नुसार राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशत: अनुदानित (टप्पाअनुदान) व कायम विना अनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यीत विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेशित कुटूंबाचे वार्षिक उत्पन्नरक्कमरु. ८.०० लक्ष किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशाआर्थिक दृष्ट्यात दुर्बलघटकांतील मुला-मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या १०० टक्के लाभ देण्यात येतो.

सदर योजना शासन निर्णय ८ जुलै २०२४ अन्वये व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिक दृष्ट्यात दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील, सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागास प्रवर्गातील नविन प्रवेशित तसेच पूर्वी पासून प्रवेश असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना उच्च व तंत्रशिक्षण विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडून वर्ष २०२४-२५ पासून शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या १०० टक्के लाभ देण्यात येणार आहे.

११.गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती योजना - (2202 0932)

| अ. क्र. | योजना | योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| १ | योजनेचे नाव | गणित व भौतिकशास्त्र विषयातील प्रज्ञावान विद्यार्थांना देण्यात येणारी शिष्यवृत्ती योजना |
| २ | योजनेबद्दलचा शासन निर्णय | शासन निर्णय दिनांक 14.05.1971, दिनांक 05.02.2004 |
| ३ | योजनेचे स्वरूप | राज्यातील गणित व भौतिकशास्त्र विषयात इ. 12 वी मध्ये विशेष प्राविण्य मिळविणा-या विद्याथ्यांना उच्च शिक्षण घेण्यास उत्तेजन मिळावे म्हणून सदर शिष्यवृत्ती दिली जाते.<br>सदर योजनेसाठी गणित विषयासाठी 50 व भौतिकशास्त्र विषयासाठी 50 असे एकुण 100 संच मंजुर आहेत. |
| ४ | योजनेचा उद्देश | राज्यातील गणित व भौतिकशास्त्र विषयात इ. 12 वी मध्ये विशेष प्राविण्य मिळविणा-या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास उत्तेजन देणे. |
| ५ | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | सर्व प्रवर्गासाठी |
| ६ | योजनेच्या प्रमुख अटी | १. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.<br>२. इ. 12 वी विज्ञान या परीक्षेत किमान 60 टक्के व गणित किंवा भौतिकशास्त्र या विषयात 60 टक्के पेक्षा अधिक गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.<br>३. पदवी अभ्यासक्रमांसाठी विज्ञान शाखेत प्रवेश घेताना गणित किंवा भौतिकशास्त्र हा प्रमुख विषय घेणारे विद्यार्थीच या योजनेसाठी अर्ज करण्यासाठी पात्र आहेत.<br>४. महाराष्ट्र बाहेर शिकत असलेले महाराष्ट्रातील विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करू शकत नाहीत<br>५. या सवलती समाधानकारक प्रगती, चांगली वर्तणूक व नियमित उपस्थिती असल्यास विहित अभ्यासक्रम संपेपर्यंत चालू राहतील.<br>६. मागील वर्षी सदर शिष्यवृत्ती चा लाभ घेतलेले विद्यार्थी शिष्यवृत्ती च्या नुतनीकरणासाठी अर्ज करू शकतात. |
| ७ | आवश्यक कागदपत्रे | 1. सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र<br>2. मागील वर्षाची गुणपत्रिका<br>3. बोनाफाईड सर्टिफिकेट |
| ८ | दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप | सदर योजनेसाठी पात्र विद्यार्थांना प्रतिमाह 100 रु. याप्रमाणे दहा महिन्याकरिता रक्कम रु. 1000/- शिष्यवृत्ती देण्यात येते. |
| ९ | अर्ज करण्याची पध्दत | नवीन मंजूरीसाठी तसेच नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. |
| १० | ऑनलाइन अर्ज करण्याचे संकेतस्थळ | www.mahadbtmahait.gov.in |

# १२.राज्य शासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती योजना- (2202 0941)

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>योजना</th><th>योजनेचा तपशिल</th></tr>
<tr><td>1</td><td>योजनेचे नाव</td><td>राज्य शासनाची दक्षिणा अधिछात्रवृत्ती</td></tr>
<tr><td>2</td><td>योजने बद्दलचाशासन निर्णय</td><td>1. शिक्षण व सेवायोजन विभाग, शा.नि.क्र. एससीएच-1065-यु, दिनांक 29 सप्टेंबर, 1965.<br>2. शासन निर्णय क्र.2 एससीएच 2003 /(405/03)/मशि 1 दि.5/2/2004</td></tr>
<tr><td>3</td><td>योजनेचा प्रकार / स्वरुप</td><td>सदर शिष्यवृत्तीसाठी खालीलप्रमाणे संच मंजूर करण्यात येतात.
<table>
<tr><th>शासकीय महाविद्यालये</th><th>निर्धारित संच</th></tr>
<tr><td>शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय औरंगाबाद</td><td>06</td></tr>
<tr><td>इस्माईल युसफ महाविद्यालय मुंबई</td><td>04</td></tr>
<tr><td>शासकीय विधी महाविद्यालय मुंबई</td><td>04</td></tr>
<tr><td>सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय मुंबई</td><td>04</td></tr>
<tr><td>शासकीय विज्ञान संस्था मुंबई</td><td>06</td></tr>
<tr><td>एलफिन्स्टन महाविद्यालय मुंबई</td><td>06</td></tr>
<tr><td>शासकीय विज्ञान संस्था नागपूर</td><td>06</td></tr>
<tr><td>वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था नागपूर</td><td>06</td></tr>
<tr><td>शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती</td><td>06</td></tr>
<tr><td>राजाराम महाविद्यालय कोल्हापूर</td><td>06</td></tr>
<tr><td>एकूण</td><td>54</td></tr>
<tr><th>विद्यापीठाचे नाव</th><th>निर्धारित संच</th></tr>
<tr><td>मुंबई विद्यापीठ मुंबई</td><td>04</td></tr>
<tr><td>सावित्रिबाई फुले विद्यापीठ पुणे</td><td>04</td></tr>
<tr><td>राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर</td><td>04</td></tr>
<tr><td>डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद</td><td>04</td></tr>
<tr><td>एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ मुंबई</td><td>02</td></tr>
<tr><td>शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर</td><td>04</td></tr>
<tr><td>एकूण</td><td>22</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>4</td><td>योजनेचा उद्देश</td><td>राज्यातील गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना पदव्युत्तर शिक्षण घेण्यास उत्तेजन मिळावे म्हणून सदर शिष्यवृत्ती दिली जाते.</td></tr>
<tr><td>5</td><td>योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव</td><td>सर्व प्रवर्गासाठी योजना लागू आहे.</td></tr>
<tr><td>6</td><td>योजनेच्या प्रमुख अटी</td><td>1. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेले विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करण्यास्तव पात्र आहेत.<br>2. विद्यार्थी उपरोक्त विद्यापीठांतर्गत पदवी परीक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण असला पाहिजे.<br>3. संच रिक्त असतील तर द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण असलेला विद्यार्थी पात्र ठरु शकेल.<br>4. विद्यापीठांतील संचासाठी ज्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठात कला, वाणिज्य, विज्ञान व विधी या विषयासाठी प्रवेश घेतलेला असेल तसेच संबंधित विद्यापीठाशी संलग्नित अशासकीय महाविद्यालयात कला, वाणिज्य, विज्ञान व विधी या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेला असेल असे विद्यार्थी अर्ज करु शकतील.</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | 5. शासकीय महाविद्यालयातील विद्यार्थी पदवी परीक्षेतील गुणवत्तेनुसार निवडले जातील. तसेच महाविद्यालयातील अधिछात्रांसाठी कला व विज्ञान अभ्यासक्रमातील विषयांसाठी **समान संच** निवडले जातील.<br>6. विद्यार्थ्यांचे अभ्यासातील **समाधानकारक प्रगती** व उपस्थितीनुसार दुसऱ्या वर्षीचे नुतनीकरण **मंजूर** करण्यात येईल.<br>7. असमाधानकारक प्रगती **व** असमाधानकारक वर्तणुक असल्यास **सदर** शिष्यवृत्ती **दिली जाणार नाही.**<br>8. **दोन** अभ्यासक्रमासाठी **प्रवेश** घेतलेला विद्यार्थी सदर शिष्यवृत्तीसाठी **पात्र असणार नाही.**<br>9. **नोकरी** करणारा **अथवा इतर** विद्यावेतन मिळविणारा विद्यार्थी **सदर** शिष्यवृत्तीसाठी **पात्र असणार नाही.** |
| 7 | आवश्यक कागदपत्रे | 1. पदवी परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्राची छायांकित प्रत.<br>2. महाविद्यालयात प्रवेश घेतलेबाबतचे बोनाफाईड प्रमाणपत्र.<br>3. सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र आवश्यक. |
| 8 | दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरुप | नवीन मंजूरीस्तव अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यास शा.नि.05.02.2004 प्रमाणे प्रति माह 250 प्रमाणे रक्कम रु. 2500/- |
| 9 | अर्ज करण्याची पध्दत | नवीन मंजूरीसाठी तसेच नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. |
| 10 | ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ | www.mahadbtmahait.gov.in |

# १३.राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती - (2202 0932)

<table>
<tr><th>अ क्र</th><th>योजना</th><th>योजनेचा तपशिल</th></tr>
<tr><td>१</td><td>योजनेचे नाव</td><td>राज्य शासनाची खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती</td></tr>
<tr><td>२</td><td>योजनेबद्दलचा शासन निर्णय</td><td>शासन निर्णय दिनांक 16.11.1964, दिनांक 05.02.2004</td></tr>
<tr><td>३</td><td>योजनेचे स्वरूप</td><td>राज्यातील गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास उत्तेजन मिळावे म्हणून सदर शिष्यवृत्ती दिली जाते. सदर योजनेसाठी एकूण 1208 संच शाखानिहाय खालीलप्रमाणे मंजूर करण्यात आलेले आहेत.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>शाखा</th><th>निर्धारित संच</th></tr>
<tr><td>01</td><td>कला</td><td>285</td></tr>
<tr><td>02</td><td>वाणिज्य</td><td>230</td></tr>
<tr><td>03</td><td>विज्ञान</td><td>638</td></tr>
<tr><td>04</td><td>विधी</td><td>55</td></tr>
<tr><td colspan="2">एकूण</td><td>1208</td></tr>
</table></td></tr>
<tr><td>४</td><td>योजनेचा उद्देश</td><td>राज्यातील गुणवत्ता धारक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेण्यास उत्तेजन देणे.</td></tr>
<tr><td>५</td><td>योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव</td><td>सर्व प्रवर्गासाठी</td></tr>
<tr><td>६</td><td>योजनेच्या प्रमुख अटी</td><td>१. अर्जदार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असणे आवश्यक आहे.<br>२. इयत्ता बारावी मध्ये किमान 60 टक्के गुण मिळवणे आवश्यक आहे.<br>३. कला, वाणिज्य, विज्ञान आणि विधी शाखेच्या पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेले विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज (Fresh) करण्यास पात्र आहेत.<br>४. महाराष्ट्र राज्याच्या बाहेर शिकत असलेले महाराष्ट्रातील विद्यार्थी या योजनेसाठी अर्ज करू शकत नाहीत.<br>५. या सवलती समाधानकारक प्रगती, चांगली वर्तणूक व नियमित उपस्थिती असल्यास विहित अभ्यासक्रम संपेपर्यत चालू राहतील.<br>६. मागील वर्षी सदर शिष्यवृत्ती चा लाभ घेतलेले विद्यार्थी शिष्यवृत्ती च्या नुतनीकरणासाठी अर्ज करू शकतात.</td></tr>
<tr><td>७</td><td>आवश्यक कागदपत्रे</td><td>१. सक्षम प्राधिकरणाने दिलेले अधिवास प्रमाणपत्र<br>२. मागील वर्षाची गुणपत्रिका<br>३. बोनाफाईड सर्टिफिकेट</td></tr>
<tr><td>८</td><td>दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप</td><td>सदर योजनेसाठी प्रतिमाह 100 रु. याप्रमाणे दहा महिन्याकरिता रक्कम रु. 1000/- शिष्यवृत्ती देण्यात येते.</td></tr>
<tr><td>९</td><td>अर्ज करण्याची पध्दत</td><td>नवीन मंजूरीसाठी तसेच नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.</td></tr>
<tr><td>१०</td><td>ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ</td><td>www.mahadbtmahait.gov.in</td></tr>
</table>

## १४.राज्य शासनाची अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती (भाग २) (2202 A338)

| अ क्र | योजना | योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| 1 | योजनेचे नाव | राज्य शासनाची इयत्ता बारावीनंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या (कला, वाणिज्य,विज्ञान पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम) राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरीता शिष्यवृत्ती योजना |
| 2 | योजने बद्दल शासन निर्णय | अल्पसंख्यांक विकास विभाग, अविवि-2011/प्र.क्र.44/11/का.6दि.14-ऑक्टोबर 2011 |
| 3 | योजनेचे स्वरूप | राज्य शासनाने अल्पसंख्यांक लोकसमुह म्हणून घोषीत केलेल्या राज्यातील मुस्लीम,बौध्द,ख्रिश्चन, जैन, शीख, पारशी व ज्यू या समाजातील तांत्रिक व व्यावसायिक तसेच इयत्ता बारावी नंतरच्या सर्व अभ्यासक्रमांध्ये शिक्षण घेणाऱ्या ( कला,वाणिज्य,विज्ञान पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम ) राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्याकरिता शिष्यवृत्ती योजना सदर योजनेचे नोडल ऑफीसर संचालक तंत्रशिक्षण हे आहेत. या संचालनालयाकडून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे अर्जानुसार विद्यार्थ्यांची यादी तंत्रशिक्षण संचालनालयकडे पाठविण्यात येते. सदर शिष्यवृत्तीची रक्कम तंत्रशिक्षण संचालनालयाकडून विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा करण्यात येते. |
| 4 | योजनेचा उद्देश | अल्पसंख्यांक समाजाच्या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे |
| 5 | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थी (मुस्लीम, बौध्द, ख्रिश्चन, जैन, शीख, पारशी व ज्यू) |
| 6 | योजनेच्या प्रमुख अटी | 1. इयत्त 12 वी नंतरच्या मान्यता प्राप्त अभ्यासक्रमांमध्ये (कला, वाणिज्य,विज्ञान) प्रथम वर्ष ते अंतिमवर्षात शिकत असलेल्या अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना लागू आहे.<br>2.विद्यार्थी हा महाराष्ट्र राज्याच्या रहिवासी असावा व त्याने उच्च माध्यमिक शालांत परीक्षा महाराष्ट्र राज्यातून उत्तीर्ण केलेली असावी.<br>3. या योजने अंतर्गत शिष्यवृत्ती धारक विद्यार्थ्याला अन्य शिष्यवृत्ती अथवा विद्यावेतन याचा लाभ घेता येणार नाही.<br>4. पालकाचे वार्षिक उत्पन्न हे रु. 8.00 लक्ष किंवा त्यापेक्षा कमी असावे.<br>5. नुतनिकरणासाठी विद्यार्थ्याने पुढील वर्षात प्रवेश घेतलेला असणे आवश्यक आहे.<br>6. या योजनेअंतर्गत 30 % टक्के शिष्यवृत्ती मुलींसाठी राखुन ठेवण्यात येतील.<br>7. जा एखाद्या विद्यार्थ्याने चुकीच्या माहितीच्या अधारे शिष्यवृत्ती मिळविली असल्याचे निदर्शनास आल्यास त्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती तत्काळ रद्द करण्यात येईल. |
| 7 | आवश्यक कागदपत्रे | 1. माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत प्रमाणत्र परीक्षा व त्यापुढील परीक्षांमधील गुणपत्रीकेच्या प्रती.<br>2. सक्षम प्राधिकरणाने देलेले अधिवास प्रमाणपत्र.<br>3. सक्षम प्राधिकरणाने देलेले पालकाचे वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.<br>4. महाविद्यालयास चालु वर्षाची फी भरल्याची पावती / रिसीप्ट.<br>5. विद्यार्थ्यांचे अल्पसंख्यांक असल्याबाबतचे स्वयंघोषित प्रमाणपत्र.<br>6. महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र. |
| 8 | दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप | प्रत्यक्ष वार्षिक शैक्षणिक शुल्क किंवा रु.5000/- यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढी रक्कम. |
| 9 | अर्ज करण्याची पद्धत | नवीन मंजुरी व नुतनीकरण यासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. |
| 10 | ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ | www.mahadbtmahait.gov.in |

# केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>योजना</th><th>योजनेचा तपशिल</th></tr>
<tr><td>1</td><td>योजनेचे नांव</td><td>केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना</td></tr>
<tr><td>2</td><td>योजने बद्दलचा शासन निर्णय</td><td>उच्च व तंत्रशिक्षण विभाग. शा. नि. क्र. संकीर्ण 2007/(542/07)/तांशि-1<br>दि. 21.01.2008</td></tr>
<tr><td>3</td><td>योजनेचा स्वरूप</td><td>केंद्रशासनाकडून राज्यातील मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, पारशी, जैन व बौध्द या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांना मॅट्रिकोत्तर शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना सन 2007-08 पासून राबविण्यात येते.<br>सदर शिष्यवृत्ती 11 वी ते पी. एचडी., व्यावसायिक (डी.एड. बी.एड. एम.एड. आय.टी.आय) सर्व अभ्यासक्रमांना देण्यात येते. (तंत्र शिक्षण विभागातील व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम यादीतील अभ्यासक्रम सोडून)<br>केंद्रशासनाकडून या शिष्यवृत्तीसाठी महाराष्ट्र राज्यासाठी 47575 संच निर्धारीत करण्यात आलेले आहेत. त्यापैकी मुलींसाठी 30 टक्के संच राखीव आहेत.<br><table><tr><th>अ.क्र.</th><th>प्रवर्ग</th><th>संच</th><th>अ.क्र.</th><th>प्रवर्ग</th><th>संच</th></tr><tr><td>1</td><td>मुस्लीम</td><td>27734</td><td>4</td><td>पारशी</td><td>96</td></tr><tr><td>2</td><td>ख्रिश्चन</td><td>2309</td><td>5</td><td>जैन</td><td>2994</td></tr><tr><td>3</td><td>शीख</td><td>477</td><td>6</td><td>बौध्द</td><td>13965</td></tr></table></td></tr>
<tr><td>4</td><td>योजनेचा उद्देश</td><td>अल्पसंख्यांक समाजाच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे.</td></tr>
<tr><td>5</td><td>योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव</td><td>मुस्लीम, ख्रिश्चन, शीख, पारशी, जैन व बौध्द या अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी सदर योजना लागू आहे.</td></tr>
<tr><td>6</td><td>योजनेच्या प्रमुख अटी</td><td>१. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.<br>२. मागील वार्षिक परिक्षेत किमान 50 टक्के गुण घेऊन उत्तीर्ण झालेला असावा.<br>३. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती / स्टायपेंड योजनेचा लाभार्थी नसावा.<br>४. अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रू. 2.00 लाख पेक्षा जास्त नसावे.<br>५. एका कुटूंबातील फक्त 2 अपत्यांनाच सदर योजनेचा लाभ घेता येईल.<br>६. शिष्यवृत्तीच्या नूतनीकरणासाठी विद्यार्थ्याने पुढील वर्गात प्रवेश घेतलेला असावा. तसेच मागील वार्षिक परिक्षेत किमान 50 टक्के गुण घेऊन उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.<br>७. विद्यार्थ्याने कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेमध्ये स्वत:चे खाते उघडणे आवश्यक आहे.</td></tr>
<tr><td>7</td><td>आवश्यक कागदपत्रे</td><td>१. मागिल वर्षाची गुणपत्रिकेची प्रत.<br>२. सक्षम प्राधिकाऱ्यांने दिलेले पालकाचे वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र आवश्यक.<br>३. सक्षम प्राधिकाऱ्यांने दिलेले रहिवास प्रमाणपत्र आवश्यक.<br>४. महाविद्यालयास चालु वर्षाची फी भरल्याची पावती.<br>५. महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र.<br>६. अल्पसंख्याक असल्याबाबतचे स्वयंघोषित प्रमाणपत्र.</td></tr>
<tr><td>8</td><td>दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरुप</td><td>केंद्रशासनाच्या नियमानुसार अभ्यासक्रमाचे शुल्क / शिक्षण शुल्क (course / Tution fee), परिरक्षण भत्ता (Maintenance Allowance) हे लाभ देण्यात येतात.<br>सदर रक्कम ही अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय, नवी दिल्ली यांचेमार्फत विद्यार्थ्यांचे थेट बँक खातेवर (DBT) जमा करण्यात येते.</td></tr>
<tr><td>9</td><td>अर्ज करण्याची पध्दत</td><td>नवीन मंजूरीसाठी तसेच नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.</td></tr>
<tr><td>10</td><td>ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ</td><td>www.scholarships.gov.in</td></tr>
</table>

# महाविद्यालयीन व विद्यापिठीय विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना

| अ.क्र. | योजना | योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| 1 | योजनेचे नांव | महाविद्यालयीन व विद्यापीठीय विद्यार्थ्यांसाठी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती योजना |
| 2 | योजने बद्दलचा शासन निर्णय | उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शा. नि. क्र. शिष्यवृ 2008/(254/08)/मशि -6, दि. 22 जानेवारी, 2009 |
| 3 | योजनेचा स्वरूप | केंद्रशासनाच्या निर्देशानुसार, इ. 12 वी मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांपैकी महाराष्ट्र स्टेट बोर्डाकडून प्राप्त झालेल्या टॉप 20 पर्सेंटाईल यादीमध्ये ज्या विद्यार्थ्यांची नावे समाविष्ट आहेत, अशा विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्तीसाठी अर्ज करता येतो.<br>सदर योजना 100 टक्के केंद्रपुरस्कृत असून, महाराष्ट्र राज्यासाठी 7417 संच निर्धारित केले आहेत. त्यापैकी अनुसुचित जातीसाठी 15 टक्के, अनुसुचित जमातीसाठी 7.5 टक्के , इतर मागासवर्गीयांसाठी 27 टक्के आणि शारिरीकदृष्ट्या अपगांसाठी 5 टक्के राखीव आहेत. |
| 4 | योजनेचा उद्देश | गुणवान विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे. |
| 5 | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | सर्व प्रवर्गासाठी. |
| 6 | योजनेच्या प्रमुख अटी | १. सदर योजनेसाठी टॉप 20 पर्सेंटाईल यादीमध्ये नाव समाविष्ट असलेल्या विद्यार्थ्यांनाच शिष्यवृत्तीच्या नवीन मंजूरीस्तव (Fresh) अर्ज भरता येईल.<br>२. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.<br>३. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड लाभार्थी नसावा.<br>४. अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रू. 8.00 लाख पेक्षा जास्त नसावे.<br>५. नुतनीकरणासाठी विद्यार्थ्याने मागील वर्षी 50 टक्के गुण प्राप्त करणे आवश्यक आहे.<br>६. महाविद्यालयामध्ये विद्यार्थ्यांची उपस्थिती 75 टक्के असणे आवश्यक आहे.<br>७. विद्यार्थ्याने कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये स्वत:चे खाते उघडणे आश्यक आहे. |
| 7 | आवश्यक कागदपत्रे | १. मागिल वर्षाची गुणपत्रिकेची प्रत.<br>२. सक्षम प्राधिकरणाने दिलेले पालकाचे वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.<br>३. सक्षम प्राधिकरणाने दिलेले रहिवास प्रमाणपत्र.<br>४. महाविद्यालयास चालु वर्षाची फी भरल्याची पावती / रिसीप्ट. |
| 8 | दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरूप | पदवी स्तर (3 वर्ष ) साठी - प्रतिवर्ष 12,000/-<br>पदव्युत्तर पदवी ( 2 वर्ष ) साठी - प्रतिवर्ष 20,000/-<br>सदर रक्कम ही मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचेतर्फे विद्यार्थ्यांचे थेट बँक खातेवर {DBT} जमा करण्यात येते. |
| 9 | अर्ज करण्याची पध्दत | नवीन मंजूरीसाठी तसेच नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. |
| 10 | ऑनलाइन अर्ज करण्याचे संकेतस्थळ | www.scholarships.gov.in |

# अपंग विद्यार्थ्यांसाठी देण्यात येणारी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना.

| अ.क्र. | योजना | योजनेचा तपशिल |
|---|---|---|
| 1 | योजनेचे नांव | केंद्रशासन पुरस्कृत अपंग विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना |
| 2 | योजने बद्दलचा शासन निर्णय | शासनाच्या दिनांक 26 फेब्रुवारी 2016 च्या पत्रान्वये सदर ऑनलाईन शिष्यवृत्ती योजनेच्या अंमलबजावणीसाठी उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. |
| 3 | योजनेचा स्वरूप | केंद्रशासनाच्या विकलांगजन सशक्तीकरण विभागामार्फत अपंग विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते. सदर योजनेची ऑनलाईन पध्दतीने या संचालनालयामार्फत अंमलबजावणी मार्च 2016 पासून करण्यात येत आहे.<br>सदर शिष्यवृत्ती 11, 12 वी, पदवी अभ्यासक्रम तसेच पदव्युत्तर (पदवी, पदविका व प्रमाणपत्र) या अभ्यासक्रमासाठी देण्यात येते.<br>महाराष्ट्र राज्यासाठी 1879 संच निर्धारीत करण्यात आलेले आहेत. |
| 4 | योजनेचा उद्देश | अपंग विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य करणे. |
| 5 | योजना ज्या प्रवर्गासाठी लागू आहे त्याचे नाव | सर्व प्रवर्गासाठी. |
| 6 | योजनेच्या प्रमुख अटी | १. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असावा.<br>२. अपंगत्व टक्केवारी 40 टक्के व त्यापुढील असावी.<br>३. मागील वार्षिक परिक्षेत उत्तीर्ण झालेला असावा.<br>४. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा / स्टायपेंड लाभार्थी नसावा.<br>५. अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न रु. 2.50 लाख पेक्षा जास्त नसावे.<br>६. एका कुटूंबातील फक्त 2 अपंग अपत्यांनाच सदर योजनेचा लाभ घेता येईल.<br>७. विद्यार्थ्याने कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये स्वतःचे खाते उघडणे आवश्यक आहे. |
| 7 | आवश्यक कागदपत्रे | १. मागिल वर्षाची गुणपत्रिकेची प्रत.<br>२. सक्षम प्राधिकरणाने दिलेले पालकाचे वार्षिक उत्पन्नाचे प्रमाणपत्र.<br>३. सक्षम प्राधिकरणाने दिलेले रहिवास प्रमाणपत्र.<br>४. महाविद्यालयास चालु वर्षाची फी भरल्याची पावती / रिसीप्ट.<br>५. विद्यार्थ्यांचे अपंग असल्याबाबतचे प्रमाणपत्र.<br>६. महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र. |
| 8 | दिल्या जाणाऱ्या लाभाचे स्वरुप | केंद्रशासनाच्या नियमानुसार, सदर योजनेंतर्गत खालील लाभ देण्यात येतात.<br>१. परिरक्षण भत्ता (Maintenance Allowance)<br>२. अपंग भत्ता (Disability Allowance)<br>३. संस्थाकडून आकारण्यात येणारे सर्व प्रकारचे ना परतावा शुल्क<br>४. पुस्तक भत्ता (Book Allowance)<br>सदर रक्कम ही विकलांगजन सशक्तीकरण विभाग, नवी दिल्ली यांचेमार्फत विद्यार्थ्यांचे थेट बँक खातेवर {DBT} जमा करण्यात येते. |
| 9 | अर्ज करण्याची पध्दत | नवीन मंजुरीसाठी तसेच नुतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे. |
| 10 | ऑनलाईन अर्ज करण्याचे संकेतस्थळ | www.scholarships.gov.in |